# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २२५ वा शुक्रवार दि.०९ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# जनतेचा कौल भाजपाच्या विरोधात; पक्षफुटीचा उद्धव ठाकरे अन् शरद पवारांना फायदा?

मुंबई – २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात मोठी राजकीय उलथापालथ पाहायला मिळाली. एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले ठाकरे–पवार एकत्र आले. मात्र अडीच वर्षात उद्धव ठाकरेंच्या हातून शिवसेना आणि शरद पवारांच्या हातून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष निसटला आहे.

राज्यातील या खेळीमागे भाजपाचा हात असल्याचे बोलले जाते. त्यामुळे लोकांमध्ये नाराजी असल्याचा दावा विरोधक सातत्याने करत आहेत. त्यातच एका सर्व्हेतूनही हेच चित्र समोर आले आहे.

राज्यात आज निवडणूक झाली तर भाजपा–शिवसेना–राष्ट्रवादी युतीला मोठा फटका बसण्याची चिन्हे आहेत. याठिकाणी विरोधी महाविकास आघाडीला ४८ पैकी २६ जागा मिळतील असा अंदाज आहे. परंतु या कॉँग्रेसला १२ आणि उद्धव ठाकरे–शरद पवार या दोघांना मिळून १४ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मूड ऑफ द नेशन या कार्यक्रमातंर्गत आजतक वृत्तवाहिनीने हा दावा केला आहे.

२०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी वेगळी भूमिका घेत उद्धव ठाकरेंविरोधात बंड पुकारले.

# सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना दैनिक महावृत्त पुस्तक भेट



लातूर :– सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची दैनिक महावृत चे संपादक अशोक हनवते यांनी आशियाना या बंगल्यावर जाऊन दैनिक महावृत्त हे पुस्तक देऊन सदिच्छा भेट घेतली.

# भाजपाच्या लातूर जिल्ह्यातील नेतृत्वात कस ; निलंगेकर, पवार की कराड – जनताच संभ्रमात!







लातूर :– लोकसभा निवडणुका समोर आल्या असतानाच राष्ट्रीय स्तरावर मोदी विरुद्ध इंडिया राजकीय खेळ सुरू असला तरी लातूर शहर व जिल्ह्यात भाजपाचा खरा वास्तववादी कोण भाजपा धार्जीण्या मतदाराने जनतेची कोणाकडे जावे अशी शंकास्पद चर्चा होताना दिसते आहे.प्रारंभीच्या काळात काँग्रेसला शह देण्यासाठी भाजपाने संभाजीराव पाटील निलेकर यांना बळ देऊन मंत्री– पालक मंत्री केले आणि त्याने भाजपाला बळ देतानाच माजी खासदार सुनील गायकवाड माजी आमदार सुधाकर भालेराव यांचे पंख छाटले पण आज घडीला आमदार संभाजीराव पाटील निलेंगेकर,आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश आप्पा कराड हे असल्याने आम्ही कोणाकडे जावे हाच प्रश्न जनतेला भेडसावतो असल्याची चर्चा होताना दिसते आहे. वास्तविक पाहता माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे खाजगी सचिव असलेले अभिमन्यू पवार हे आमदार आहेत पण राजकीय खेळीतून आमदार निलंगेकर यांना फडवणीस जमेत घेत असले तरी भाजपाचे जिल्हा अध्यक्ष असलेले कराड हे आज विधान परिषदेवर असल्याने कराड यांच्यासह आमदार अभिमन्यू पवार यांच्या शब्दालाही शिंदे – फडवणीस – पवार सरकारमध्ये किंमत असल्याने बेरजेचे राजकारण करण्याऐवजी वजाबाकीचे राजकारण करणाऱ्या आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्याच राजकीय प्रवासावर प्रश्नचिन्ह उभे असल्याचे दिसते आहे.



राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष श्री सुभाष पारधी लातूर दौऱ्यावर आले असता त्यांचे शाल व पुस्तिका देवुन स्वागत करण्यात आले. यावेळी अँड व्यकटराव बेंद्रे, श्री विश्वनाथ इंगळे, अँड प्रदिपसिंह गंगणे, पत्रकार श्री साईनाथ घोणे आदी उपस्थित होते

# गौण खनिज वाळू उपसा चालूच हफ्तेखोर अधिकारी कोण!

लातूर :– नेहमीप्रमाणेच लातूर तालुक्यात व जिल्ह्यात गौण खनिज वाळूची चोरटी वाहतूक उपसा वगैरे ही बाब नेहमीचीच आहे पण काल–परवा तहसीलदाराच्या आदेशानुसार वाळू उपसा करणाऱ्या वाहनास हायवा,टिप्पर, ट्रॅक्टर अशा वाहनास अवैध धंदा केल्यामुळे खटला दाखल केला जातो पण त्यातून काहीच निष्पन्न होत नसल्याने गौण खनिज अवैध उपसा वाहतूक ही जुगाड करूनच केली जाते की काय अशीच चर्चा महसूल विभागात होताना दिसते आहे. गौण खनिज वाळू उपसा, मुरूम उपसा, दगड उपसा, वाहतूक कारवाई वृत्तपत्रात बातम्या हे सारे नेहमीचेच कागदी घोडे चालत असतात पण जे कोणी अवैध वाळू उपसा करतात ते सहजपणे वाहनातून परस्पर घेऊन जातात कधीतरी पांढऱ्या कागदाचे काळे करून शासन दरबारी दाखवण्यासाठी गौण खनिजे वाहतूक करणाऱ्या वाहनास आडविने जो हप्ता देतो त्यास सोडून न देणारे वाहन जप्त करणे आणि तेही गायब होणे असे प्रकार सर्रासपणे घडतात त्यात तहसीलदाराचे दुर्लक्ष की उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांना बदनाम करण्याचा डाव आहे अशीच चर्चा होताना दिसते आहे. विशेष म्हणजे वाळू उपसा लातूरच नव्हे तर जिल्ह्यात होतच असतो पण लातूरच्या परिसरातील वाळू उपसा सर्रास होतो आहे कारण त्यात तहसीलदार हे हप्ते घेतात पण ते मंडळ अधिकारी, तलाठी की महसूल सहायकाकडून त्यांच्या मार्फत वसूल करतात तहसीलदाराचे एक विश्वासू कर्मचारी अवैध वाळू उपसाकरणाऱ्याकडून हप्ता वसुलीसाठी कार्यरत असल्याचे बोलले जात आहे त्या संदर्भात वरिष्ठ अधिकारी चौकशी करून शासकीय महसूल अबाधित ठेवतील काय अशीही चर्चा होताना दिसते आहे.

**उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांना बदनाम करण्याचा डाव !**



# प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यालय गेले कोठे!








लातूर :– प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे जगात भारत हा महासत्ता देश बनविण्याचा प्रयत्न करीत असतानाच प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून गाव, पाडे शहर हे जिल्ह्याला जोडण्याचा कार्यक्रम राबविला जात असतानाच लातूर येथील सदरील योजना राबविणारे प्रधानमंत्री ग्रामसडक योजना कार्यालय हे कोठे आहे कोणत्या नगर – गल्लीत आहे. तसा फलक लावला आहे काय यासंदर्भात खेड्यापाड्यातील लोक ग्रामसडक योजनेचा लाभ मिळावा म्हणून लातूरात हेलपाटे घालीत असले तरी ते कार्यालय आहे की गुप्त ठिकाणी आहे अशी शंका ग्रामस्थ करीत असल्याचे दिसते. ग्रामीण भागातील जनतेची ओरड ग्रामसडक योजनेची आस यामुळे तमाम जनता त्रस्त असल्याची कून कून दैनिक महावृत्तच्या प्रतिनिधीस लागतात संबंधित कार्यालयाच्या शोध घेतला असता सदरील कार्यालय एकमत चौक औसा रोडवरील पंचवटी नगरातील हनुमान मंदिरासमोर गंगा येथे असल्याचे पादचाऱ्याने सांगितल्यावरून तेथे पाहणी केली असता तेथे कार्यालय म्हणावे असे काहीच नव्हते पण बाथरूम, किचन, बेडरूम अर्थात निवासस्थान होते पण अशा नि वासावर प्रधानमंत्री ग्राम सडक योजना कार्यालय किंवा त्याच्या आदिपत्याखाली चालणाऱ्या संस्थेचे नावही नसल्याने हे सारे गोड बंगाल काय हाच प्रश्न सर्वत्र चर्चिला जातो आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचा हेतू गाव, खेडे, पाडे शहर जुळवून त्यातून माणसं एकत्रित करण्याचा हेतू असताना नोकरदार अधिकारी अभियंताच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेला छेद देऊन पहात असतील तर अशा अधिकारी कर्मचारी वर्गाची कसून चौकशी करावी अशी मागणी होताना दिसते आहे. वास्तवात लातूर येथे कार्यालय आहे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, मुख्य लिपिक, कारकून, शिपाई हे सारे तैनात आहेत ते पगार उचलतात पण त्या गंगा निवास मध्ये त्यांनी सरकारी योजनेतील प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यालय थाटले आहे त्या संदर्भात लोक संपर्क किंवा भ्रमणध्वनी संपर्क होत नसल्याने यातील गोड बंगाल काय आहे. ग्रामसडक योजना गंगेतून कोण्या खेड्याकडे जात आहे अशी ही शंकास्पद चर्चा होताना दिसते आहे.

**गंगा निवास कोणाचे- सरकारी की खाजगी**

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय....

## सं.पक्षहरण– अंक दुसरा!

शरद पवार यांनी स्वतःच स्थापन केलेल्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय रंगमंचावर एक नवे नेपथ्य उभे करणारा ‘राष्ट्रवादी काँग्रेस’ नावाचा पक्ष हा त्यांचा नसून, सत्ताचक्राच्या ‘खेळा’त सापडलेल्या अजित पवार यांचा तो आहे, असे निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे आता म्हणावे लागते. आयोगाच्या या निर्णयात धक्कादायक वा अनपेक्षित असे काहीच नव्हते.मात्र, यामुळे वयाची ऐंशी पार केलेल्या पवारांना पुन्हा एकदा नवे नाव आणि नवी निशाणी घेऊन मैदानात उतरावे लागणार आहे. ही कोणालाही क्लेश देणारीच बाब असणार. पवारांसाठी ‘नवा पक्ष, नवी निशाणी’ हा खेळ नवा नसला, तरी पूर्वी नवी निशाणी घेऊन मैदानात उतरताना त्यांना साथ देणारे त्यांचे जिवाभावाचे बहुतेक शिलेदार आता त्यांच्यासोबत नाहीत.मात्र एक गोष्ट नक्की आणि ती म्हणजे हा निवाडा झाल्यावरही पवार आपली उमेद आणि ईर्षा हरवून बसलेले नाहीत. त्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीला आता महाराष्ट्राची जनता कशी आणि किती साथ देते, ते पाहायचे. शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडानंतर बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली ‘शिवसेना’ उद्धव ठाकरे यांची नाही, असा निवाडा करणारा निवडणूक आयोग, राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतरही तीच भूमिका घेणार, हे राज्यातील सारेच लहानथोर जाणून होते.मात्र, शिवसेनेतील फूट आणि ‘राष्ट्रवादीती’ल फूट यांच्यात फरक आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर जवळपास एका तपाने शिंदे यांनी बंडाचे निशाण फडकवले होते. पवारांना मात्र आपल्या हयातीतच आपला पक्ष फुटल्याचे आणि तोही आपल्या सख्ख्या पुतण्यानेच फोडल्याचे पाहावे लागले.शरद पवार यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत अनेक वळणे घेतली. १९७८ मध्ये त्यांनी बंड करून ‘पुलोद’ स्थापले आणि ते राज्याचे सर्वात तरुण मुख्यमंत्री बनले. तेव्हा त्यांनी स्थापन केलेल्या एस–काँग्रेसमधील त्यांचे अनेक जिवाभावाचे सहकारी त्यांचे सरकार बरखास्त झाल्यानंतर काँग्रेसमध्ये गेले. तरीही पवारांनी जिद्दीने ‘पुरोगामी लोकशाही आघाडी’ची स्थापना करून १९८५ मध्ये काँग्रेसला शर्थीची लढत दिली होती.मात्र, १९८६ मध्ये ते स्वतःच काँग्रेसमध्ये दाखल झाले आणि पुनश्च एकवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. नरसिह राव यांच्या सरकारात ते संरक्षणमंत्रीही होते. मात्र, १९९९ मध्ये सोनिया गांधी यांच्या विदेशीपणाचा मुद्दा उपस्थित करत, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली आणि काँग्रेसबरोबर राज्यात सरकारही स्थापन केले. ते सरकार सलग १५ वर्षे टिकले! मात्र, पवारांची स्मरणात राहणारी आणखी एक खेळी म्हणजे २०१९ मधील निवडणुकीनंतर त्यांनी केवळ काँग्रेसच नव्हे तर शिवसेनेलाही सोबत घेऊन ‘महाविकास आघाडी’ स्थापन केली आणि भाजपच्या हातातोंडाशी आलेली सत्ता हिरावून घेतली. शिवसेनेतील बंडामुळे ते सरकार पडले आणि त्यानंतर आठ महिन्यांपूर्वी अजित पवारही पवारांच्या मातब्बर शिलेदारांना घेऊन थेट भाजपच्या मांडीस मांडी लावून बसले.तेव्हापासून सुरू झालेली पवारांची नवी लढाई आता निवडणूक आयोगाच्या या निवाड्यामुळे आणखी एका महत्त्वाच्या वळणावर येऊन ठेपली आहे. चंद्राबाबू नायडू यांनीही अशाच पद्धतीने आपले श्वशुर एन. टी. रामाराव यांच्या हातातून तेलगु देसम पक्ष हिसकावून घेत आंध्रचे मुख्यमंत्रिपद काबीज केले होते. तेव्हा नायडू यांनी पक्ष आणि राज्याच्या हितासाठी आपल्याला हे करणे भाग पडले, असे सांगितले होते.अजित पवारही देशाचा विकास आणि मोदींचे नेतृत्व वगैरे भाषा करीत असले तरी त्यांनी हा निर्णय का घेतला, ते सर्वश्रुत आहे!निवडणूक आयोगाच्या निवाड्याचे टायमिंगही भुवया उंचावायला लावणारे आहे. मंगळवारची संध्याकाळ उलटून गेल्यावर तो जाहीर करण्यात आला. महाराष्ट्रातून राज्यसभेवर पाठवायच्या सहा खासदारांच्या निवडणुकीची प्रक्रिया बुधवारपासून सुरू होत आहे.त्यापूर्वी हा निर्णय घेतला गेल्यामुळे आता या निवडणुकीत अजित पवार यांच्या ‘राष्ट्रवादी’चा ‘व्हीप’ हा शरद पवार यांच्याकडे शिल्लक असलेल्या आमदारांना लागू होऊ शकतो काय, हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. अजित पवार यांच्याकडे असलेली आमदारांची संख्या लक्षात घेता, त्यांचा उमेदवार विजयी होणार, हे उघड आहे. हाच मुद्दा याच निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्यासमवेत असलेल्या आमदारांबाबतही उपस्थित होईल.राज्यसभा निवडणुकीचा निकालही या पार्श्वभूमीवर अपेक्षित असला, तरी खरी ‘राष्ट्रवादी’ कोणाची, याचा फैसला मात्र महाराष्ट्राची जनता विधानसभेच्या निवडणुकीतच करणार आहे, हे उघड आहे. पक्षांतरांच्या प्रकारांविषयी पूर्वी चिंता व्यक्त होत असे. आता ‘पक्षहरण’ हा नवाच प्रकार रुजू पाहतोय.दर पाच वर्षांनी मतदान करून सत्ता कोणाची हे लोक ठरवतात, हे तत्त्व आता फक्त कागदावर राहणार की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. याचे कारण निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी जर स्वार्थ आणि सोईनुसार राजकीय भूमिका घेऊन सत्तेचा खेळ खेळणार असतील तर लोकांचा या व्यवस्थेवरील विश्वास उडण्याचा धोका आहे.

# इतिहास घडविणारे कामगार नेते रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे.

आज च्या बहुसंख्य कामगारांना आणि कामगार नेत्यांना कामगार चळवळीचा संघर्ष मय इतिहास माहिती नाही. रविवारची सुट्टी सर्वच घेतात. काशी मिळाली हेच माहिती नाही,वेळेवर पगार आठ तास दिवटी नंतर वर टाईम्स कोणामुळे मिळतो हा इतिहास वाचला पाहिजे तरच कामगारांना स्वताचे रक्षण करता येईल. अन्यता असंघटित कामगारांची गुलाम फौज तयार होईल. देश सध्या त्याच वाटेने मार्गक्रमण करतांना दिसत आहे. भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबाहदूर नारायण मेघाजी लोखंडे वाचा आणि जागरुतेचा विस्तव विझु देऊ नका.

रावबहाद्दुर नारायण मेघाजी लोखंडे (जन्म १३ ऑगस्ट,१८४८, मृत्यू ९ फेब्रुवारी,१८९७ ) हे एक भारतीय कामगार पुढारी होते.नारायण मेघाजीं लोखंडे यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील खेड (राजगुरुनगर) जवळचे कन्हेरसर होते. ते माळी समाजाचे शेतकरी कुटुंबात जन्मले होते. त्यांनी गरीब परिस्थितीतून माध्यमिक शिक्षण पुरे केले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर, लोखंडे यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली होती. तेथे त्यांना कामगार दहशतीच्या वातावरणात काम करतांना दिसले.दिवसातून १३–१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार पाहिले. त्यांना आठवडयाची सुटीही मिळत नसे,वेळेवर पगार मिळत नव्हता तेव्हा त्यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले. त्यांनी बॉबे मिल हंड्स असोसिएशन ही गिरणी कामगार संघटना २३ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापन केली. ही कामगार संघटना भारतातील संघटित कामगार चळवळीची सुरुवात मानली जाते. भारतातील स्वाभिमानी कामगार चळवळीचे जनक म्हणून नारायण मेघाजी लोखंडे ओळखले जातात. ते महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज मुंबई शाखेचे अध्यक्षही होते. तसेच सत्यशोधक चळवळीतली त्यांची कामगिरीही लक्षवेधी व महत्त्वपूर्ण मानली जाते. मुंबईत १८९६ मध्ये प्लेगची मोठी साथ उसळली. या साथीत अनेक लोक मृत्युमुखी पडले. त्यावेळी नारायण मेंघाजी लोखंडे पुढाकार घेऊन सरकारी मदतीने प्लेगग्रस्तांसाठी एक ‘मराठा इस्पितळ’ काढले होते. परंतु दुर्देवाने लोखंडे यांनाच प्लेगने पछाडले व त्यातच त्यांचा ९ फेब्रुवारी,१८९७ अंत झाला. असे इतिहास घडविणारे कामगार नेते रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे होते. त्यावेळची कामगार चळवळ आणि आजची कामगार चळवळ मोठा फरक आहे.



भारतात आज कामगार संघटना ट्रेड युनियन राजकीय पक्षाच्या बटीक झाल्या आहेत. त्यामुळे भांडवलदार मालक वर्ग राजकीय पक्षाला भरपूर निवडणूक निधी देऊन नेत्यांनाच विकत घेत आहेत.म्हणुन सर्वच क्षेत्रातील संघटीत कामगारांचे जिवन उध्वस्त झाले आणि होत आहे. भांडवलदार आणि उच्चवर्णीयांच्या गुलामगिरीतून असंघटीत कष्टकरी कामगार,मजुर,शेतमजुरनां मुक्त व्हायचे असेल तर त्यांनी सर्व प्रथम स्वबळावर संघटीत झाले पाहिजे.राजकीय पक्षाच्या नेतृत्वाखाली संघटीत झाल्यामुळे आज कामगार,कर्मचारी देशोधडीला लागले आहेत.हे कोणी नाकारू शकत नाही.सेवा निवृत्त झालेल्या कामगारांच्या रिकाम्या जागा न भरता ठेकेदारी पद्धत सुरु होण्यास संघटीत कामगारांच्या ट्रेड युनियन जबाबदार आहेत.म्हणुन सर्वच क्षेत्रात ठेकेदारी पद्धतीने असंघटीत कामगारांचे शोषण मोठया प्रमाणात होत आहे.जे काम कायम स्वरूपी चालते,असते त्या कामासाठी ठेकेदारी देण्याचा प्रश्नच येत नाही. ते काम ठेकेदारी वर देणे म्हणजे भांडवलशाही आणि ब्राह्मणशाहीचे उघड समर्थन करणे होय!.यालाच महात्मा फुले यांच्या नेतृत्वाखाली रावबहादुर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी विरोध करून देशव्यापी संप घडवुन आणला होता.हे आजच्या सर्व ट्रेड युनियन चालविणारे नेते विसरले आहेत.कारण आजच्या ट्रेड युनियन मनुवादी,हिंदुत्ववादी विचाराचे खंबीर समर्थक आहेत.त्यांना कामगार कर्मचाऱ्यात समानता नको आहे.तर मनुवादी जातीची विषमता म्हणजेच जातीव्यवस्थाच हवी आहे.यालाच बहुसंख्य पुरोगामी समाजवादी, आंबेडकरवादी कामगार कर्मचारी साथ देतात.यांचे जिवंत उदाहरण म्हणजे सर्वात मोठे कामगार कर्मचारी असलेलं सार्वजनिक क्षेत्र रेल्वे उधोग धंद्यामधील नॅशनल रेल्वे मजदूर युनियन (छठ्चण )आणि सेंट्रल रेल्वे मजदूर संघ (उठचड). यात बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय कामगार कर्मचारी अधिकृत सभासद आहेत. त्यांना १२ व १३ फेब्रुवारी १९३८ मनमाड येथे रेल्वे गँगमन कामगारांच्या दोनदिवशीय कामगार परिषद मध्ये डॉ बाबासाहेबांनी सांगितलेले आजही त्यांना मान्य नाही.मग कामगार कर्मचाऱ्यांवर अन्याय अत्याचार होणारच !.

सुशिक्षीत व सुरक्षित नोकरी करणारे संघटीत असतात. म्हणून त्याच्या वर कोणी कधीच अन्याय, अत्याचार करीत नाही. तशी हिंम्मत कोणी ही करीत नाही.कुटूंबातील एक व्यक्ती सुशिक्षीत झाला तर त्याला सुरक्षीत नोकरी मिळते. नोकरी मिळाली की आर्थिक प्रश्न सुटतो. त्यामुळे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक समस्यावर मात करता येते. असंघटित कष्टकरी गिरणी कामगारांना कामाचे तास नव्हते, आठवडयाची साप्ताहिक सुट्टी नव्हती. गिरणीत काम करताना गंभीर दुखापत झाली तर दवाखाण्याचा खर्च मिळत नव्हता.कामावर नाही तर पगार नाही. काम करून महिना झाला तरी कोणत्या तारखेला पगार मिळेल याची हमी नाही.या सर्व समस्यांवर असंघटित कष्टकरी गिरणी कामगाराचे नेते नारायण मेंघाजी लोखंडे यांनी गिरणी कामगारांना संघटीत करून गिरणी मालक संघा विरोधी संघर्ष करीत होते. मालक दाद देत नव्हते.तेव्हा त्यांनी ५५०० गिरणी कामगारांच्या सहया घेऊन फँकटरी कमीशनचे अध्यक्ष डब्ल्यु.बी. मुलक यांच्याकडे १५ ऑक्टोबर १८८४ रोजी पिटीशन दाखल केले होते.त्याचे फळ सहा सात वर्षाच्या संघर्षा नंतर १० जून १८९० ला मिळाले. त्यावेळी गिरणी मालक संघाने जाहीर सभा घेऊन त्यात नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुचविलेल्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून मान्य केल्या.तेव्हा पासून म्हणजे १० जून १८९० पासून सर्व सार्वजनिक सरकारी कार्यालयांना कंपन्यांना उपक्रमांना रविवार ही साप्ताहिक हक्काची सुट्टी मिळत आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार मंत्री असताना कामगार कायदयात तशी कायमची तरतुद करून ठेवली. पण त्याची अंमलबजावणी आजही कुठेच होताना दिसत नाही.मग इंटक,आयटक,सिटू,बीएमएस,एच एम पी,सारख्या राष्ट्रीय ट्रेड युनियन काय करतात?.आजच्या अनेक सुशिक्षित व सुरक्षित नोकरी करणार्यांना नोकरदारांना याची माहिती नसेल?. असे म्हणता येईल काय?. त्यांनाच काय त्यांच्या कामगार संघटना, युनियन चालविणाऱ्या नेत्यांना सुध्दा रविवारची सुटटीचे जनक हे असंघटित कष्टकरी गिरणी कामगारांना संघटीत करणारे सत्यशोधक चळवळीचे माळी समाजाचे कुशल संघटक व कुशल वक्ते रावबहादुर नारायण मेंघाजी लोखंडे होते हे माहित नसावे?. असले तरी त्यांची कधीच वाच्यता करायची नाही.म्हणजे नोंद न घेता कमी लेखने नाही क ा य ? .

आज देशातील अंसघटीत कष्टकरी कामगार, मजूरांनी त्यांच्या संस्था संघटना, चालविणार्यांनी नारायण मेघाजी लोखंडे यांच्यापासून प्रेरणा घेवून संघटीत शक्ती निर्माण करण्याकरिता प्रयत्न केले पाहिजे.कामगाराच्या एकजुटीमुळे देशातील मोठयातमोठा भांडवलदार व उच्चवर्गीय प्रशासकीय अधिकारी संघटित शक्तीपुढेही झुकतो.हा इतिहास विशेष करून असंघटित कष्टकरी कामगार,शेतमजूर,नाका कामगार,घरकामगार व सर्व क्षेत्रातील कामगारांनी वाचला पाहिजे.कारण देशात सर्वांत जास्त देशात ९३ टक्के असंघटीत कष्टकरी कामगार आहेत. त्यांनी १० जून १८९० हा असंघटित कष्टकरी कामगाराचा पहिला विजय दिवस म्हणून साजरा केला पाहिजे.



महात्मा ज्योतीराव फुले यांची सत्यशोधक चळवळ ही देशातील तमाम ब्राम्हणेत्तर म्हणजे आजचे बहुजन,आदिवासी,मागासवर्गीय जाती जमातीतील कष्टकरी समाजाकरीता होती सर्व समाजाचे नेते विसरले आहेत.विशेष आंबेडकरी चळवळीतील बुध्दीजीवी साहित्यिक, कामगार नेते बहुजन, आदिवासी, भटक्यांना मागासवर्गीयांना कामगार मानत नाही. फक्त त्याची जात पाहतात.कामगार संघटना बांधताना त्यांना विशिष्ट विचारधारा पाहिजे. त्या शिवाय कामगारांना संघटीत करता येत नाही. कामगार म्हणून त्यांचे प्रश्न,समस्या, जाणून न घेता त्याची जात पाहून संघटना बांधू पाहणारे नेते न्याय मिळवून देतील काय? म्हणून आंबेडकरी चळवळीची विचारांची केंद्रस्थानी एकही संघटना मान्यताप्राप्त होऊ शकली नाही. ज्या असोसिएशन आहेत त्याचेही वैचारीक पातळीवर एकमत नाही.सर्व क्षेत्रातील संघटीत कामगारांची ही स्थिती असेल तर असंघटीत कामगारांची काय परिस्थिती असेल?. आज पर्यंत संघटीत कामगरांनी असंघटीत कामगारांना कामगार म्हणून पाहिले नाही. जो असंघटित कामगार नेहमीत काम नसल्यामुळे वार्षिक वर्गणी भरू शकत नाही तो आपली संघटना कसा चालवत असतील ?. त्याचे नेते बनण्याचे कोण धाडस करले? हे आज आपण पाहतो. ते धाडस नारायण मेंघाजी लोखंडे यांनी त्याकाळी केले. आज कष्टकरी कामगारांना अन्न,वस्त्र,निवारा,रोजगार,शिक्षण आणि आरोग्य हया माणसाच्या सहा मुलभूत गरजा भागविताना बहुजन समाजाचे खुप मोठया प्रमाणात शोषण होत आहे.या सर्व शोषित पिडीत समाज घटकाला संघटीत करून न्याय हक्क व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी महात्मा ज्योतीराव फुले यांचे सर्वोत्तम शिष्य नारायण मेंघाजी लोखंडे अहोरात्र झगडत होते.ती सत्यशोधकाची चळवळ अनेक अंगाने देशातील कानाकोपर्यात पोहचली आहे.

गिरणी कामगारांना रविवार सुट्टी मिळू नये यासाठी गिरणी मालकांनी या देशातील भटा ब्राम्हणंना उच्चवर्णीयातील बुध्दीजींवीना कामगारात बुध्दीभेद करण्याच्या कामावर लावले होते. त्यानुसार गिरणी कामगारांना रविवार हा ख्रिश्चन धर्मियांचा दिवस आहे. त्यामुळे हिंदू असलेल्या गिरणी कामगारात चुकीचा प्रचार व प्रसार चालला होता. तेव्हा सरकार पुढे मोठा पेच निर्माण झाला होता.तेव्हा सरकारने बॉम्बे मिल हँडस मिल असोशिएनचे अध्यक्ष नारायण मेघाजी लोखंडे यांना रविवार हा सुट्टीचा दिवस ठेवण्यामागची भक्कम कारणे व आवश्यकता याबाबत मत विचारले होते.सत्यशोधक चळवळीत काम करणारे लढाऊ नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी रविवार हा केवळ ख्रिश्चन धर्मियाचा दिवस नाही तर तो हिंदूचा ही धार्मिक दिवस आहे याचे ठोस पुरावे म्हणजे बहुजन समाजातील प्रसिध्द कुळ दैवत खंडोबा व कुलस्वामिनी या देवताचा रविवार हाच दिवस मानला जातो.बहुसंख्य गिरणी कामगार हे खंडोबाचे भक्त आहेत. परंतु केवळ या कारणाकरीता म्हणून रविवार संबध नाही. कारण भारतात ही चाल फार पुर्वी पासून आहे.ब्रिटीश प्रशासनाने सुरवाती पासून सर्व समाजाला सर्व वर्गाना, सर्व धर्मींयाना सोयीचा सुट्टीचा दिवस म्हणून रविवार मानला असल्याने तोच दिवस कामगाराना सुट्टीचा दिवस असावा असे ठासून सांगितले. कार्यालयीन काम करणाऱ्या कर्मचार्यांना रविवार सुट्टी तर कष्टकरी कामगारांना वेगवेगळया दिवशी सुट्टी.आजही आपल्या देशातील कंपन्या कारखाने व इंडस्ट्रीयल इस्टेट मधील गाला खात्याचे मालक आपल्या सोईने कामगार मजुरांना सुट्टी देतात.असंघटीत कष्टकरी कामगारांना तर हक्कांची सुट्टी नाही. ज्या दिवशी काम नसेल तोच त्याचा सुट्टीचा दिवस.आता पुन्हा १८८० सारखी परिस्थिती संघटीत असंघटीत कामगारांची होत आहे.याला केवळ राष्ट्रीय ट्रेड युनियन जबाबदार नाहीत. तर तो सर्व जाती धर्माचा कामगार कर्मचारी जो स्वतःला बहुजन,मागासवर्गीय समाज म्हणुन फक्त राजकीय आरक्षण घेण्यासाठी राजकीय पक्षाची गुलामी पत्करतो. पण पक्षाची ट्रेड युनियनची वैचारिक मांडणी, विचारधारा पाहत नाही. म्हणुन महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्य शोधणारी,सांगणारी व अंमलबजावणी करण्या करीता संघर्ष करणारी चळवळ उभी केली होती तीच स्विकारली पाहिजे होती.पण ती विस्कळीत का झाली.त्यांचे आत्मचिंतन करून काम केले.तर भारतातील बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय कामगार कर्मचारी यांचे भविष्य उज्वल राहील.ज्यानी भारतात पहिली असंघटीत संघटीत कामगारांची संघटना काढून संघर्ष केला. इतिहास घडविणारे कामगार नेते भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे या थोर कामगार नेत्याच्या महान कार्यास, आजच्या (९ फेब्रुवारी) स्मृतिदिनी कोटी कोटी प्रणाम !!!.

************

**आपल**

**सागर रामभाऊ तायडे.**

**.९९२०४०३८५९.**

**अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना संलग्न स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.**

# मोफतचे आरक्षण घेणाऱ्यांनो द्यायची तर साथ द्या,फक्त सल्ले नकोत.

७ मे २०१९ च्या शासन निर्णयास स्वतंत्र मजदूर युनियन ने ’हायकोर्ट मुंबई’ मध्ये सुप्रीम कोर्ट वरीष्ठ अधिवक्ता मा.इंदिरा जयसिंग मैडम द्वारे आपली बाजु मांडण्यात आली.या सुनावणी आपल्याकडुन ७ मे चा जीआर हा पूर्णत:असंवैधानिक असल्याचे सहप्रमाण मा.कोर्टा समोर सांगण्यात आले होते. राज्य सरकारचे ५ लाखा पेक्षा जास्त डउ/ड्ढ/छ्ढ/तगछ्ढ/ड्इउ चे कर्मचारी,अधिकारी आहेत. पण ते सर्व कोणत्या ना कोणत्या आरक्षण विरोधी एन्टी आंबेडकरी विचाराच्या विरोधी ब्राम्हणीविचारधारेच्या युनियन संघटनेत तन,मन व धनाने योगदान देत असतात.आणि आपल्याच हक्कावर स्वत: संकट ओडाऊन घेत असतात.७ मे चा जीआर हा त्याचाच एक भाग होता. तेंव्हा समस्त डउ/ड्ढ/जइउ/छ्ढ/तगछ्ढ/ड्इउ राज्य सरकारी कर्मचार्यांने व अधिकाऱ्यांनी ब्राम्हणीईजम व आरक्षण विरोधी कामगार,अधिकारी संघटनेतुन त्वरीत बाहेर पडायला पाहिजे होते.ते होत नसल्यामुळे राज्या सरकारच्या सर्व विभागात मागासवर्गीय कर्मचार्यांनी व अधिकार्यांनी स्वयंस्फूर्तिने युनियन,संघटन स्थापन करने आजच्या काळाची गरज आहे व त्या सर्व संघटनानी क्रांतिकारी आंबेडकरवादी विचाराच्या स्वतंत्र मजदूर युनियनला संलग्न करने आवश्यक आहे. त्यासाठी मोफतचे आरक्षण घेणाऱ्यांनो द्यायची तर साथ द्या,फक्त सल्ले नकोत.



७ मे २०१९ च्या जीआर ने सर्वच म्हणजे ५ लाखा पेक्षा जास्त राज्य सरकारी मागासवर्गीय (डउ/ड्ढ/छ्ढ/तगछ्ढ/ड्इउ) कर्मचार्यात व अधिकार्यात असंतोष होता. पण तो कुठे गेला समजत नाही. फक्त असंतोष करुन चालणार नाही, तर ह्या असंतोषास संघटने मध्ये रुपांतर करुन त्यांना संघर्षा मध्ये उतरवावे लागेल.मग तो संघर्ष संवैधानिक मार्गाने न्यायालयाच्या माध्यमातुन असेल व जन आंदोलनाच्या सनदशिर माध्यमातुन असेल.यासाठी संघटनेचे संख्याबळ लाखोंने असने सर्वात महत्वाचे ठरते.

देशात राष्ट्रीय पातळीवर बारा ट्रेड युनियन आहेत. त्यांचे नांवे वेगवेगळी असली तरी ध्येय उदिष्ट एक आहे हेच मागासवर्गीय कामगार,कर्मचारी अधिकारी विसरतात. आणि त्यांचे सभासद बनून राहतात. त्यासाठी त्यांनी प्रथम क्रांतिकारी आंबेडकरी विचारांची स्वतंत्र मजदूर युनियनचा संकल्प आहे तो स्वीकारला पाहिजे.फक्त राज्या पूर्ताच नाही तर केंद्रीय देशपातळीवर १३ वी एक मात्र क्रांतिकारी आंबेडकरी विचारांची स्वतंत्र मजदूर युनियन म्हणून तमाम डउ/ड्ढ/जइउ च्या राज्य व केंद्र सरकारी कर्मचारी, अधिकारी व असंघटीत क्षेत्रात कार्यरत आपल्या गरीब नडलेल्या अडलेल्या व सामाजिक न्याया पासुन कोसो दुर असलेल्यांचे प्रतिनिधित्व करण्याचे आय एल यू ने ठरविले आहे व तसा प्रयत्न करत आहे.राज्य शासनाच्या नव्हे तर देशातील सर्व विभागात मागासवर्गीय कर्मचारी व अधिकार्यांची युनियन,संघटन स्थापन करून त्यास स्वतंत्र मजदूर यूनियनला संलग्न करणे हे उदिष्ट असले पाहिजे. त्यागमूर्ती आदरणीय जे. एस. पाटील यांच्या नेतृत्वाखाली देशातील कामगारांना जागरूक करण्याचे काम सुरू आहे.जर आपण आज जागे नाही झालोत,तर येणारा काळ आजच्या कर्मचारी अधिकारी वर्गाला कधीच माफ करणार नाही.हे लक्षात घ्यावे. त्यासाठी एक छोटीशी गोष्ट खाली देतो. वाचून समजून घ्याल ही अपेक्षा.तर चला मग जिथ कुठं कार्यरत असाल तिथे क्रांतिकारी आंबेडकरी विचारांच्या युनियनची स्थापना करा व तिला स्वतंत्र मजदूर युनियनला संलग्न करून आपली स्वतःची ताकत वाढवा व आरक्षण विरोधी व्यवस्थेशी यशस्वी लढा द्या. एकदा एक पक्षी चोचीने समुद्रातील पाणी बाहेर काढत होता. दुसऱ्या पक्षाने विचारलं – भाऊ तू हे काय करतो आहेस ? पहिला पक्षी बोलला– या समुद्राने माझी पिल्लं बुडवलीत. आता तर मी या समुद्राला सुकवूनच टाकतो. हे ऐकून दुसरा पक्षी बोलला– अरे भावड्या तुझ्याकडनं कसा काय सुकेल समुद्र ? तू एवढासा जीव अन् समुद्र एवढा विशाल. तुझं तर संपूर्ण आयुष्य अपूरे पडेल यासाठी. तर पहिला पक्षी बोलला – दादा! द्यायची तर साथ दे, फक्त सल्ले नकोत. हे ऐकून दुसरा पक्षी पण साथ द्यायला लागला. असे हजारो पक्षी येत गेले व दुसऱ्यांना सांगत गेले की,सल्ले नकोत साथ पाहिजे. हे पाहून विष्णुदेवाचं वाहन गरुड पण ह्या कामासाठी जायला निघाला. विष्णु देव म्हणाले अरे तू कुठे चाललास ? तू गेलास तर माझं काम खोळंबेल. अन् तसंही तुम्हा सर्व पक्ष्यांकडून समुद्र काही सुकला पण जाणार नाहीये. गरुड बोलला – देवा सल्ला नको साथ द्या. मग काय,हे ऐकून विष्णुदेव पण समुद्र सुकवायसाठी पुढे आले. विष्णु देवाला पाहून समुद्र घाबरला आणि त्याने त्या पक्षाची पिल्लं परत केली. ह्या संकट समयी आपल्या देशाला देखील आपला सल्ला नको साथ हवी आहे. आज रोजी सरकारवर नुसती टीका करणारे नकोत तर समाजासोबत उभे राहून त्यांची सेवा करणाऱ्या लोकांची गरज आहे. त्यामुळे दादांनो,सल्ले नकोत साथ द्या. जेव्हा साथ देईल संपूर्ण भारत, तेव्हा पुन्हा आनंदी होईल भारत. देशातील सर्व मागासवर्गीय डउ/ड्ढ/छ्ढ/तगछ्ढ/ड्इउ चे कर्मचारी,अधिकारी आहेत. त्यांनी आताच निर्णय घ्यावा.येणाऱ्या निवडणुकीत आपण सर्वच कर्मचारी अधिकारी असणार आहात. पण आजच्या मनुवादी मानसिकतेशी दोन हात करण्याची हिंमत तुमच्या असणार आहे काय?.त्यासाठी १७/१८ फेब्रुवारी २०२४ ला सुरेश भट सभागृहात स्वतंत्र मजदूर युनियन चे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. त्यात आंबेडकरी विचारांचे सुप्रसिद्ध विचारवंत,विधितज्ञ,मार्गदर्शन करणार आहेत.करीता संघटित असंघटित लाखोंच्या गुलामानी नव्हे तर स्वाभिमानाने जगणाऱ्या लढणाऱ्या असंघटित कामगार,संघटित कर्मचारी अधिकारी वर्गाने सहभागी व्हावे.

************

**सागर रामभाऊ तायडे,**

**९९२०४०३८५९,**

**अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन.**

# भीमराज कि बेटी किरण पाटणकर यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीचा आवाज हरपला..!



किरण पाटणकर यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथे झाला होता. त्यांना गीत गायनाची फार आवड होती. किरण पाटणकर यांनी गायनाच्या क्षेत्रात पदार्पण केले. त्यांच्यावर लहानपणापासूनच कव्वालीचे संस्कार झाले होते .धम्मक्रांतीचा प्रचार प्रसार करून आंबेडकरी चळवळ संपूर्ण महाराष्ट्रभर जनमाणसात रुजवणाऱ्या लोक गायकांमध्ये प्रमुख नाव असलेल्या व लोकप्रिय गायक नागोराव पाटणकर यांच्यात कन्या होत्या . आपल्या वडिलांचा गौरवास्पद वारसा अधिक उंचावर नेत स्वतःची ' भीमराज कि बेटी ' अशी ओळख निर्माण करणाऱ्या प्रसिद्ध गायिका किरण पाटणकर म्हणून त्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्रभर आहे. लोक गायक म्हणून नावावर उपास येत असताना त्या काळात गावोगावी मंडई, शंकरपाठ , मेळावे भीम जयंती, बुद्ध जयंती अशा विविध कार्यक्रमातून किरण पाटणकर यांचा कव्वालीचा बाज बहरत गेला. आंबेडकरी जलशामधून माध्यमातून किरण पाटणकर चा आवाज सर्व दूर घुमत गेला. आनंद शिंदे, जानी बाबू मजीद शोला अशा त्या काळातील मोठमोठ्या गायकासोबत किरण यांचा दुय्यम कवाली च्या सामन्याची लोक आतुरतेने वाट पाहायचे त्यांच्या आंबेडकरी गीतातून आंबेडकर चळवळीला अधिक बळ मिळत होते.

नगरसेवक ते लोकसभेची निवडणूक :– सांस्कृतिक मन तयार करण्यासाठी लोक कलावंतांचा फार मोठा वाटा आहे. त्यामुळे त्यांनी नगरसेवकाची निवडणूक लढवून जिंकली होती. पुढे रामटेक लोकसभा मतदारसंघात सुद्धा त्यांनी निवडणूक लढवून ९५ हजार मतं घेतली होती. स्त्री लोकगायिकेतील एक झंजावत:– किरण पाटणकर यांचे नाव घेतले की हास्यच्या दशकातील काळ आठवतो. मुंबई पुण्यातील नावाजलेल्या कवाली सोबत किरण ताई पाटणकर यांचा पहाट होईपर्यंत गीत गायनाचा कार्यक्रम चालायचा एकंदरीत सर्व स्तरावर त्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जात होते. बंधू रं शिपाया..दे रे दे रूपाया, चोरीच्या खनाला रं दिवाळीच्या सणाला... या गीतात त्या एका गरीब बहिणीची कहाणी सादर करताना महिला सह भाऊ आणि वडिलांच्या डोळ्यातही अश्रू उभे राहायचे. फिका पडे दिल्लीचा नवाब, भीम ने संविधान दिया, मै भीमराज कि बेटी अशा अनेक सुंदर भीम गीतांची त्यांनी रचना केली होती. किरण पाटणकर यांचे सोमवारी दिनांक६ फेब्रुवारी रोजी दीर्घ आजाराने बेझनबाग येथील निवासस्थानी निधन झाले. त्या ६२ वर्षाच्या होत्या त्यांच्या पार्थिवावर वैशाली घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. किरण पाटणकर यांनी आयुष्यभर बुद्ध फुले शाहू आंबेडकर शिवराय यांचा विचार गाव खेड्यासह घराघरात आपल्या गायनाच्या माध्यमातून पोहोचवला .त्यांच्या पाश्चात मुलगा व मोठा हप्त परिवार आहे. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीतील गायनातील आवाज हरपला किरण पाटणकर यांना विनम्र भावपूर्वक श्रद्धांजली...

लेखक– सिद्धार्थ तायडे
मु. पो. वडनेर भोलजी.
ता.नादुरा. जि.बुलढाणा. मो.न.९३०९७६७३८८

## जेवणानंतर लगेच फळं खावी का? फळं खाण्याची योग्य वेळ कोणती? जाणून घ्या



जेवणानंतर तुम्ही लिंबूवर्गीय फळे खाता का? संत्रा, लिंबू, द्राक्ष ही सर्व आंबट फळे आहेत जी त्यांच्या उत्कृष्ट चवसाठी ओळखली जातात. यामध्ये व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते. हे एक शक्तिशाली अँटी–ऑक्सिडेंट आहे जे रोगप्रतिकारक शक्तीला समर्थन देते आणि कोलेजन वाढविण्यास देखील मदत करते.आंबट फळे जरी अगणित फायदे देत असली तरी जेवणानंतर आंबट फळे खाणे चांगले नाही. येथे आम्ही तुम्हाला जेवणानंतर आंबट फळे खाण्याचे काही दुष्परिणाम सांगत आहोत जे तुम्ही नेहमी लक्षात ठेवावे.लिंबूवर्गीय फळांचे फायदे काय आहेत?लिंबूवर्गीय फळांमध्ये आहारातील फायबर असते, त्यामुळे ते बद्धकोष्ठता दूर करतात आणि पोट निरोगी ठेवतात आणि पचन बरोबर ठेवतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन्स आणि अँटीऑक्सिडंट्स शरीराला निरोगी ठेवण्यासाठी खूप मदत करतात. पण जेवणानंतर ते खाणे योग्य मानले जात नाही.१. ॲसिड समस्या लिंबूवर्गीय फळे आम्लयुक्त असतात आणि दुपारच्या जेवणानंतर लगेच त्यांचे सेवन केल्याने काही लोकांच्या पचनक्रिया बिघडू शकतात. ॲसिडिटीमुळे अस्वस्थता, अपचन किंवा छातीत जळजळ होऊ शकते, विशेषतः ॲसिड रिफ्लक्सचा त्रास असलेल्या लोकांनी हे करणे टाळावे. २. पोटदुखी जेवणानंतर लिंबूवर्गीय फळे खाताना काही लोकांना पोटदुखी किंवा गॅस यांसारख्या समस्या जाणवू शकतात. विशेषतः जर त्यांची पचनसंस्था संवेदनशील असेल. त्यामुळे अशा लोकांनी चुकूनही जेवणासोबत आंबट फळांचे सेवन करू नये. शक्यतो अन्न खाल्ल्यानंतर फळे खायची असतील, तर लक्षात ठेवा की अन्न खाल्ल्यानंतर लगेच फळे खाऊ नका. जेवण आणि फळांमध्ये थोडे अंतर ठेवण्याचा प्रयत्न करा, अन्यथा तुम्हाला जास्त गरम होणे किंवा अपचन यासारख्या तक्रारी उद्भवू शकते.

## मधुमेहाच्या रुग्णांनी मूग डाळ का खावी? या डाळीचा आहारात कसा समावेश करावा? जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात

भारतीय जेवणात डाळींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मधुमेह असलेल्या लोकांसाठी डाळी या अत्यंत पौष्टिक आणि फायदेशीर आहेत. जेव्हा कर्बोदके शरीरात सहजपणे शोषून घेतले जातात, तेव्हा रक्तातील ग्लुकोजची पातळी हळूहळू वाढते; पण डाळीतील फायबर कर्बोदके शोषण्याची क्षमता कमी करतात आणि त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहण्यास मदत होते.डाळींमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटिन्स असतात; जे स्नायूंना मजबूत करण्यासाठी गरजेचे आहे. जर तुम्ही शाकाहारी असाल, तर हा एक उत्तम स्रोत आहे. मांसाहारी लोकसुद्धा एक उत्तम पर्याय म्हणून डाळीचे सेवन करू शकतात. कडधान्यांमध्ये सहसा फॅट्सचे प्रमाण कमी असते आणि त्यामुळे तुमच्या कंबरेवरील फॅट वाढत नाही.सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तीन चमचे कडधान्य (७० ग्रॅम) हे भाजीपाला आणि फळांइतकेच पोषक घटक पुरवते. ज्या दिवशी तुम्ही फळे किंवा भाज्यांचे सेवन केले नाही, त्या दिवशी तुम्ही डाळीचे सेवन करू शकता. त्याविषयी अपोलो रुग्णालयाच्या मुख्य पोषण तज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.१०० ग्रॅम पुदिन्याच्या पानांमध्ये दडलंय काय? डोकं व पोटाच्या 'या' त्रासांना करता येईल रामराम, तज्ज्ञांचं मत वाचाच कोणत्या डाळीचा आहारात समावेश करावा?डॉ. प्रियंका रोहतगी सांगतात, मूगडाळीचा आहारात समावेश करावा. या डाळीचा ग्लायसेमिक इंडेक्स ३८ असतो. एखादा पदार्थ आपल्या रक्तातील साखरेच्या पातळीवर किती लवकर परिणाम करू शकतो, यावरून ग्लायसेमिक इंडेक्स ठरवला जातो. ५५ पेक्षा कमी ग्लायसेमिक इंडेक्स मधुमेहाच्या रुग्णांसाठी चांगला समजला जातो. मूगडाळीमध्ये कर्बोदके मोठ्या प्रमाणात असतात. त्या डाळीमध्ये अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. २०१५ च्या एका अभ्यासात सांगितले आहे की, मूगडाळीपासून बनवलेली



बिस्किटे ही मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर असतात. मूग डाळीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर, प्रोटिन्स व मिनरल्स असतात. या डाळीमध्ये असलेल्या लोहामुळे मधुमेह असलेल्या लोकांचा अशक्तपणा दूर होतो. त्या पुढे सांगतात, मूगडाळ शिजायला फार वेळ लागत नाही. मूगडाळ खाल्यानंतर भूक नियंत्रणात राहते. शिजवण्याच्या पद्धतीमुळे डाळीच्या ग्लायसेमिक इंडेक्सवर परिणाम होतो; पण शिजवल्यानंतरही त्यात भरपूर षोषक घटक असतात.मूगडाळीचा आहारात समावेश कसा करावा? आपण अनेकदा आहारात डाळीचा समावेश करतो; पण वेगवेगळ्या पद्धतीने डाळीचा समावेश करू शकता. तुम्ही डाळीचे सूपमध्ये घालून सेवन करू शकता किंवा डाळ उकळून खाऊ शकता. त्याशिवाय तुम्ही मूगडाळ सॅलडमध्ये एकत्रित करून आहारात घेऊ शकता.आहारातील पौष्टिक घटकाबरोबरच जीवनशैलीतील इतर घटकांचा विचार करून मूगडाळ ही उत्तम पर्याय म्हणून मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते.

## पवईत रमाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी.



मुंबई / अनिल काकडे :– भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती पवईस्थीत महात्मा ज्योतिबा फुले नगर मध्ये कर्तव्य बहुउद्देशीय फाउंडेशच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली. माता रमाई आंबेडकरांच्या जयंती निमित्ताने रामाईंच्या फोटोचे प्रतिमा पूजन करण्यात आले तसेच विभागातील लहान मुलांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अभिजित बाबर, आकाश डोके, जितू सावंत, वरिष्ठ रहिवाशी संजय मिसाळ, गंगाराम खरात, विनोद शेजवळ, अमोल खरात, दिपक राजभर रोहन कोरी, अक्षय मोहिते, आणि संस्थेचे व आंबेडकरी चळवळीतले कार्यकर्ते उपस्थित होते.

## देशातील तीन हजार मशिदी टार्गेटवर

लखनौ : योगींच्या एका विधानामुळे राजकीय वाद सुरू झाला असून यावर समाजवादी पार्टीकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. सपा खासदार एसटी हसन म्हणाले की, बाबरी मशिदीचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने सोडवला होता. आता ज्ञानवापी, मथुरा, ताजमहाल, कुतुबमिनार सह देशभरातील तीन हजार मशिदींवर यांचे लक्ष आहे. निवडणुका तोंडावर आल्या आहेत, मतांचे ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या गोष्टी देशाला कमकुवत करणार, हे या लोकांना कळत नाही का?असा सवाल त्यांनी यावेळी केला.अयोध्येत प्रभू श्रीरामांचे भव्य मंदिर उभारल्यानंतर आता वाराणसी आणि मथुरेचा मुद्दा जोर धरत आहे. दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही विधानसभेत अयोध्येसह काशी आणि मथुरेचा उल्लेख केला. बहुसंख्य समाजाला आपल्या श्रद्धेसाठी भीक मागावी लागली. आता नंदी बाबा (काशी) म्हणतात मी का थांबू, असे योगी यावेळी म्हणाले. सीएम योगी पुढे म्हणाले की ज्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णाने दुर्योधनाला पांडवांसाठी पाच गावे मागितली होती, त्याचप्रमाणे आम्ही फक्त अयोध्या, मथुरा आणि काशी, या तीन ठिकाणांबद्दल बोललो होतो.

## जुईनगर येथील निलगिरी सोसायटीत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :– जुईनगर येथील निलगिरी सोसायटी मध्ये अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात सत्यनारायण पूजा व त्या अनुषंगाने लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, व तसेच महिलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सदर सोसायटीत विविध धर्म, परंपरा, भाषा यांचा आदर राखून एकीने राहतात व



एकमेकांच्या सुखा दुः खात नेंहमी सहभाग घेत असतात असें सोसायटी अध्यक्ष : हेमंत नर, सचिव : चंद्रकांत दळवी, तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खजिनदार : अँड. नवीन प्रतापे आणि राहुल पवार यांनी केले आसे आमच्या प्रतिनिधीस कळवले.

# कोरेगाव भीमा ऐतिहासिक जयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढा...येत्या रविवारी वाशीनाका (चेंबूर)मध्ये जनजागृती अभियान....

मुंबई : १ जानेवारी १८१८ रोजी कोरेगाव भीमा येथे ब्रिटिश आणि पेशवे यांच्यात युद्ध झाले व या युद्धात जुलमी, अन्यायी पेशवाईचा अंत झाला. या युद्धाचे स्मरण म्हणून कोरेगाव भीमा येथे जयस्तंभ बांधण्यात आला व तिथे रखवालदार म्हणून माळवदकर ठेवण्यात आला होता याच माळवदकर कुटुंबाने ऐतिहासिक जयस्तंभ आणि जयस्तंभ परिसरातील जागेवर अतिक्रमण केले असून त्या अतिक्रमणाच्या विरोधात भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग समितीच्या माध्यमातून न्यायालय लढाई लढत आहे. ही न्यायालयीन लढाई अत्यंत व्यवस्थित सुरू असताना ज्यांनी अतिक्रमण यांनी केलं त्या माळवदकर कुटुंबातील एका सदस्यांनी काही दिवसांपूर्वी जयस्तंभ आमची खाजगी मालमत्ता आहे अशा प्रकारचे विधान केले होते तर भीमा कोरेगांव येथे लढाई झाली नाही तर चकमक झाली असे लोकांमध्ये संभ्रम निर्माण करणारे पुस्तक लिहिले आहे. माळवदकर कुटुंबाच्या या कृत्यामुळे आंबेडकरी जनतेमध्ये मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे. कोरेगाव भीमा येथे लढाई झाली की नाही? जयस्तंभ नेमका कुणाचा? व १ जानेवारीला जयस्तंभ परिसरात प्रवेश करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी का घ्यावी लागते? हा न्यायालयीन खटला काय आहे? हे सर्व जाणून घेण्यासाठी चेंबूर येथील सिद्धार्थ कॉलनी व मानखुर्द येथील आंबेडकरी अनुयायांनी भीमा कोरेगाव जयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढा लढणारे दादाभाऊ अभंग यांचे व्याख्यान ठेवलं होते. ही दोन्ही व्याख्याने आंबेडकरी चळवळीतील अत्यंत तळमळीचे कार्यकर्ते चेंबूर वाशीनाका येथील महावीर कांबळे यांनी ही सर्व माहिती आमच्या विभागातील समाज बांधवांना समजावी म्हणून त्यांनी विनंती केली त्यांच्या विनंतीचा मान देऊन येत्या रविवारी दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी वैशाली बुद्ध विहार, कुकरेजा वसाहत, नागाबाबा नगर, वाशीनाका, मुंबई ४०००७४ येथे सायंकाळी ६.३० वाजता कोरेगाव भीमा जयस्तंभ अतिक्रमण व संविधानिक न्यायालयीन लढा या विषयावर भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांचे व्याख्यान आयोजित केले असून आपल्या सर्वांच्या अस्मितेचा व गंभीर हा विषय समजून घेण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते महावीर कांबळे, प्रभाकर धनवे उत्तम चोपडे, श्रीकांत जगताप, अविनाश काजळे, मुकुंद लोंढे, कैलास देहाडे, सन्नी कांबळे, संदीप मोरे, आनंद केदारे, बबन लोंढे, अशोक काळे, महेंद्र कांबळे, कुंदन कांबळे, परशुराम गडांकुश, विद्यानंद डावरे, राजू जोगदंड, अजय बोराडे, दादू सोनवणे, बाळकृष्ण मोरे, प्रितेश कांबळे, श्रीकांत लोंढे, विक्रम कांबळे, निखिल कांबळे आणि सर्व वाशीनाका मधील पुरुष आणि महिला सामाजिक कार्यकर्ते




यांनी आयोजन केले आहे . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील या लढ्यासाठी मैदानात उतरलेले सिद्धार्थ कॉलनी मधील युवा कार्यकर्ते तृषभ आव्हाड,जयेंद्र गायकवाड, आकाश किरतकर, सुमेध गायकवाड, राज त्रिभुवन, सुनील खैरनार, सामाजिक कार्यकर्ते मोहन सोनवणे हे मेहनत घेत आहे. वाशी नाका चेंबूर या परिसरातील सर्व आंबेडकरी चळवळीतील सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते महावीर कांबळे यांनी केले आहे.

कोरेगाव भीमा ऐतिहासिक जयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढा...येत्या रविवारी वाशीनाका (चेंबूर)मध्ये जनजागृती अभियान....

मुंबई : १ जानेवारी १८१८ रोजी कोरेगाव भीमा येथे ब्रिटिश आणि पेशवे यांच्यात युद्ध झाले व या युद्धात जुलमी, अन्यायी पेशवाईचा अंत झाला. या युद्धाचे स्मरण म्हणून कोरेगाव भीमा येथे जयस्तंभ बांधण्यात आला व तिथे रखवालदार म्हणून माळवदकर ठेवण्यात आला होता याच माळवदकर कुटुंबाने ऐतिहासिक जयस्तंभ आणि जयस्तंभ परिसरातील जागेवर अतिक्रमण केले असून त्या अतिक्रमणाच्या विरोधात भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग समितीच्या माध्यमातून न्यायालय लढाई लढत आहे. ही न्यायालयीन लढाई अत्यंत व्यवस्थित सुरू असताना ज्यांनी अतिक्रमण यांनी केलं त्या माळवदकर कुटुंबातील एका सदस्यांनी काही दिवसांपूर्वी जयस्तंभ आमची खाजगी मालमत्ता आहे अशा प्रकारचे विधान केले होते तर भीमा कोरेगांव येथे लढाई झाली नाही तर चकमक झाली असे लोकांमध्ये संभ्रम निर्माण करणारे पुस्तक लिहिले आहे. माळवदकर कुटुंबाच्या या कृत्यामुळे आंबेडकरी जनतेमध्ये मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे. कोरेगाव भीमा येथे लढाई झाली की नाही? जयस्तंभ नेमका कुणाचा? व १ जानेवारीला जयस्तंभ परिसरात प्रवेश करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी का घ्यावी लागते? हा न्यायालयीन खटला काय आहे? हे सर्व जाणून घेण्यासाठी चेंबूर येथील सिद्धार्थ कॉलनी व मानखुर्द येथील आंबेडकरी अनुयायांनी भीमा कोरेगाव जयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढा लढणारे दादाभाऊ अभंग यांचे व्याख्यान ठेवलं होते. ही दोन्ही व्याख्याने आंबेडकरी चळवळीतील अत्यंत तळमळीचे कार्यकर्ते चेंबूर वाशीनाका येथील महावीर कांबळे यांनी ही सर्व माहिती आमच्या विभागातील समाज बांधवांना समजावी म्हणून त्यांनी विनंती केली त्यांच्या विनंतीचा मान देऊन येत्या रविवारी दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी वैशाली बुद्ध विहार, कुकरेजा वसाहत, नागाबाबा नगर, वाशीनाका, मुंबई ४०००७४ येथे सायंकाळी ६.३० वाजता कोरेगाव भीमा जयस्तंभ अतिक्रमण व संविधानिक न्यायालयीन लढा या विषयावर भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांचे व्याख्यान आयोजित केले असून आपल्या सर्वांच्या अस्मितेचा व गंभीर हा विषय समजून घेण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते महावीर कांबळे, प्रभाकर धनवे उत्तम चोपडे, श्रीकांत जगताप, अविनाश काजळे, मुकुंद लोंढे, कैलास देहाडे, सन्नी कांबळे, संदीप मोरे, आनंद केदारे, बबन लोंढे, अशोक काळे, महेंद्र कांबळे, कुंदन कांबळे, परशुराम गडांकुश, विद्यानंद डावरे, राजू जोगदंड, अजय बोराडे, दादू सोनवणे, बाळकृष्ण मोरे, प्रितेश कांबळे, श्रीकांत लोंढे, विक्रम कांबळे, निखिल कांबळे आणि सर्व वाशीनाका मधील पुरुष आणि महिला सामाजिक कार्यकर्ते यांनी आयोजन केले आहे . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील या लढ्यासाठी मैदानात उतरलेले सिद्धार्थ कॉलनी मधील युवा कार्यकर्ते तृषभ आव्हाड,जयेंद्र गायकवाड, आकाश किरतकर, सुमेध गरुड, राज त्रिभुवन, सुनील खैरनार, सामाजिक कार्यकर्ते मोहन सोनवणे हे मेहनत घेत आहे. वाशी नाका चेंबूर या परिसरातील सर्व आंबेडकरी चळवळीतील सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते महावीर कांबळे यांनी केले आहे.

# विकास स्वामी यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित कला क्रीडा व पत्रकारांना न्याय देणारे उत्तम व्यासपीठ - गहिनीनाथ महाराज औसेकर



चाकूर प्रतिनिधी : कला क्रीडा पत्रकारांना न्याय देणारे उत्तम व्यासपीठ म्हणजेच रंगकर्मी कला क्रीडा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाचे कार्य हे कौतुकास्पद आसुन उत्तम प्रकारचे न्याय देणारे व्यासपिठ आहे. असे ह भ प गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी उद्गगार काढले.

पत्रकार विकास स्वामी यांना उदगीरच्या शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये रंगकर्मी कला,क्रीडा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराचे वितरण ह.भ.प गहीनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते व सिनेअभिनेत्री प्रेरणा खरात, दिगंबरराव नेटके, सिने अभिनेते साहेबराव पाटील, यांच्या प्रमुख उपस्थितीमधे पुरस्काराचे वितरण करण्यात आले. स्वामी यांच्या डोंबारी समाजातील महिलेला पंचायत समीतीच्या ध्वजवंदनाचा मिळाला बहुमान बातमीसाठी हा शोधवार्ता पुरस्कार देण्यात आला. प्रसंगी या प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रा. बिभीशन मद्देवाड, उपाध्यक्ष प्रा.भगीरथर सगर, सचिव सिद्धार्थ सुर्यवंशी,बस्वेश्वर डावळे, सुधाकर नाईक, बबन कांबळे, नागनाथ गुट्टे, संग्राम पवार, मनोहर लोहारे, शेख अझरोदिन, शंकर बोईनवाड उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.याबद्दल विकास स्वामी यांचे अभिनंदन केले जात आहे.

# दवाखान्यात रुग्णहक्क संहिता, दरपत्रक लावण्यात यावे

किनवट.ता.प्रतिनिधी / शेख शौकत: महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यानुसार सर्व दवाखान्यात रुग्ण हक्क संहीता, दरपत्रक फलक व रुग्णासाठी टोल फ्री नंबर सह तक्रार निवारण कक्ष ची माहीती दर्शनी भागात लावणे बंधनकारक असून किनवट शहरातील बहुतांश दवाखान्यात सदर नियमाचे सर्रास उल्लंघन होत असून याविषयी सामाजिक कार्यकर्ते बबन वानखेडे यांनी तालुका आरोग्य अधिकारी किनवट यांना निवेदन देऊन सर्व दवाखान्यात रुग्णहक्क संहिता, दरपत्रक व तक्रार निवारण कक्ष टोल फ्री नंबर दवाखान्याच्या दर्शनी भागात फलक लावण्याची मागणी केली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

किनवट तालुका हा दुर्गम आदिवासी बहुल भाग असून बऱ्याच वेळेस ग्रामिण भागातील कुठलीही माहीती नसलेले रुग्ण उपचार घेण्यासाठी येत असतात. रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना दाखल झालेल्य रुग्णांच्या आजारा विषयी तसेच इतर सर्व बाबींची चौकशी करणे करीता रुग्ण हक्क संहीता, दरपत्रक व रुग्णाची उपचार घेत असतांना कांही तक्रार उद्भवल्यास तक्रार निवारणासाठी टोल फ्री नंबर सह तक्रार निवारण कक्ष ची माहीती दर्शनी भागात लाऊन नियमांचे पालन करण्यात यावे. जेनेकरुण रुग्ण व रुग्णालय यांच्यात वाद उद्भवणार नाही. महाराष्ट्र सुश्रूषागृह नोंदणी २०२१ नियम च्या अधिसूचने नुसार (नियम ११ क्यू) मध्ये नमुद रुग्ण हक्क संहीता फलक, दरपत्रक तक्रार निवारण कक्ष या विषयी फलक दर्शनी भागात लावण्यात येऊन अधिसूचनेतील तरतुदीचे पालन करण्यात यावे.अन्यथा सदर तरतुदीचे पालन न करणाऱ्या दवाखान्या विरुध्द महाराष्ट्र (बाम्बे) नर्सिंग होम रजिस्ट्रशन ॲक्ट, १९४९ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी बबन वानखेडे यांनी केली आहे.

# त्रिरत्न बुद्ध विहार, औसा येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी. रमाईच्या त्यागामुळे महिलांचे अधिकार सुरक्षित सुनिता शिंदे- आल्टे यांचे प्रतिपादन.

औसा :- भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा औसा व समता नगर शाखा औसा. यांच्या वतीने समता नगर येथील त्रीरत्न बुद्ध विहारामध्ये त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त रमाई व्याख्यात्या सुनिता शिंदे- आल्टे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या म्हणाल्या की, महिलांच्या कल्याणासाठी व अधिकारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटनेमध्ये तरतूद केली, त्याच्या पाठीमागे माता रमाई यांची प्रेरणा व त्याग आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भारतीय बौद्ध महासभा औसा तालुकाध्यक्ष ड धम्मदीप डांगे, प्रमुख पाहुणे म्हणून समता सैनिक दलाचे डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे , माजी तालुका अध्यक्ष उद्धव लोंढे सर उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्षा कीर्तीताई कांबळे यांनी केले, माजी नगराध्यक्षा निताताई सुर्यवंशी, शहर उपाध्यक्ष सुरेखाताई टेंकाळे, उपाध्यक्षा रुक्मीनबाई रामचंद्र कांबळे, संस्कार सचिव सुजाता किरण सेलुकर, महिला सचिव शारदाताई मुरलीधर कावळे, संरक्षण सचिव मनिषा विष्णू गवळी व पंचशिला दयानंद कांबळे,शहर सचिव उर्मिलाताई कांबळे, शहर सचिव नंदाताई लोंढे, संरक्षण उपाध्यक्षा रमाताई कांबळे यांच्या हस्ते राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सुनिता शिंदे - आल्टे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समता नगर येथील महिला उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. मा.तालुकाध्यक्ष लोंढे सर यांनीही याप्रसंगी विचार मांडले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका सरचिटणीस दिलीप बौद्धवीर यांनी केले.अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाची सांगता सरणत्तय या धम्मपालन गाथेने करण्यात आली.

# पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथील एक अधिकारी निलंबित तर आठ पोलीस अमलदारांची पोलीस मुख्यालयात बदली.

लातूर :- पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथील एक अधिकारी निलंबित तर आठ पोलीस अमलदारांची पोलीस मुख्यालयात बदली.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण समोर दिनांक ३१/०१/२०२४ रोजी बकरा कापन्याचे घटनेची बातमी विविध माध्यमांतून प्रसिद्ध झाली होती.

त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी तात्काळ उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर दिलीप भागवत यांना सदर घटनेच्या चौकशी चे आदेश दिले होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी,उदगीर दिलीप भागवत यांनी सदर घटनेची चौकशी केली असता प्राथमिक दृष्ट्या सदर घटनेस जबाबदार धरून पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे कार्यरत पोलीस उपनिरीक्षक यांना निलंबित करण्यात आले असून पोलीस ठाण्यातील पोलीस ०८ पोलिस अमलदारांची पोलीस मुख्यालयात बदली करण्यात आली आहे.

तसेच पोलीस निरीक्षकांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात कु. करीना निर्मळ हिचा सत्कार संपन्न



लातूर :- महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील बी.ए. प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी कु. निर्मळ करीना नारायण हीला फेब्रुवारी २०२३मध्ये झालेल्या इयत्ता बारावी परीक्षेमध्ये ९० टक्के गुण मिळाले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण, लातूर विभाग यांच्याद्वारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुरस्कार रोख रुपये दहा हजार नुकतीच तिच्या बँक खात्यावर जमा झाले आहे. त्याबद्दल तिचा श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड. श्रीकांत अप्पा उटगे आणि अशोक अप्पा उपासे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे आणि शिष्यवृत्ती विभाग प्रमुख यशपाल ढोरमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कु. निर्मळ करीना हिची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून सुद्धा तिने जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण केले आहे आणि त्यामुळे तिचे पुढील सर्व शिक्षण व्यवस्थितरित्या होत आहे तिला महाविद्यालयाने विविध रूपाने आर्थिक आणि शैक्षणिक मदत सुद्धा केलेली आहे तिच्या या उज्वल यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तिला हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# उल्हासनगर मध्ये पुर्व वैमनस्यातुन तरुणाची निर्घुण हत्या

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर कँप ३ येथील इमली पाडा या ठिकाणी राहत असलेल्या राहुल जयस्वाल या तरुणाची सात जणांच्या टोळक्याने डोळ्यात मिरची चा स्प्रे मारुन चाकुने जबर वार करुन निर्घुण हत्या केल्याची घटना घडली असुन या हत्ये प्रकरणी मध्यवर्ती पोलिसानी तीन जणाना अटक केली आहे.

उल्हासनगर कँप ३ येथील इमली पाड्यात राहुल जयस्वाल (२८ ) हा आपल्या परिवारासह राहत असुन त्याची गाडी स्थानिक गुंड बाबु उर्फ मनोहर ढकनी याने काही महिन्या पुर्वी जाळली होती. तेव्हा राहुल याने बाबु ची पोलिसात तक्रार केली होती. या तक्रारीवरुन बाबु ढकनी याला जेल झाली होती . दरम्यान जामीनावर सुटल्यावर बाबु हा राहुल याला केस मागे घेण्यासाठी तगादा लावला होता . मात्र राहुल हा केस मागे घेत नव्हता. हाच राग मनात धरुन बाबु ढकनी याने आपल्या सहा साथीदाराना घेवुन काल मध्यरात्री राहुल च्या घरावर दगडफेक केली. दरम्यान राहुल हा पोलिस तक्रार करन्यासाठी निघाला असता, त्याला फालवर लाईन चौकात धरुन त्याच्या डोळ्यात मिरचीचा स्प्रेम मारुन त्याच्यावर चाकुने वार केले. ते ऐवढ्यावरच थांबले नाही तर त्यांनी पेवर ब्लॉक च्या दगडाने तोंडावर जबर मारुन जखमी केले . या हल्यात राहुल चा जागीच मृत्यु झाला . दरम्यान या घटनेची माहीती मिळताच मध्यवर्ती पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय वाघमारे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी जावुन राहुल चे शव ताब्यात घेवुन मध्यवर्ती रुग्णालयात शवविच्छेदनासाठी

# माता रमाबाई आंबेडकर यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणादायी डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांचे प्रतिपादन

अहमदपूर :- रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावली. रमाईने आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी यावर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्यात. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही त्यामुळेच माता रमाबाई आंबेडकर यांचे जीवन भारतीय महिलांसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन युवक नेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. येथील बौध्द नगर येथे त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौध्द महासभेच्या महिला जिल्हाध्यक्षा करूणाताई



कांबळे,रिपाई तालूकाध्यक्ष अरूणभाऊ वाघंबर,अंजलीताई वाघंबर आदींची प्रमुख उपस्थिती होती.सूरूवातीला त्रीशरण, पंचशिल घेवून सामूहिक अभिवादन करण्यात आले. पूढेबोलतानाडॉ.सिध्दार्थकूमारसूर्यवंशीम्हणालेकी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडणघडणीत माता रमाई यांचे योगदान अतुलनीय होते. रमाई यांनी केलेला त्याग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेली साथ, प्रेरणा आणि त्यांच्या संघर्षांच्या काळात दिलेला पाठिंबा कौतुकास्पद आहे. रमाई यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची खूप मोठी आहे. त्यांनी डॉ.बाबासाहेबांच्या सदैव सोबत राहून त्यांच्या कार्यात त्यांना प्रोत्साहित केले. बाबासाहेबांच्या महान व्यक्तिमत्त्वाचा आदर संपूर्ण जगात केला जातो. त्यांना विश्वविख्यात करण्यात रामाईंचे मोठे योगदान आहे. ज्या वेळी बाबासाहेबांना कठीण परिस्थितीत कोणी साथ देत नव्हते, त्या वेळी रमाई यांनी बाबासाहेबांची साथ कधीच सोडली नाही. डॉ. बाबासाहेबांनी भारतीय महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी कायम प्रयत्न केले. त्याचे प्रतिबिंब भारतीय संविधानात उमटले आहे. संविधानाने भारतीय महिलांना समान अधिकार आणि हक्क दिले आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जीवनराव गायकवाड यांनी केले तर आभार राणी गायकवाड यांनी मानले. या प्रसंगी करूणाताई कांबळे, अरूणभाऊ वाघंबर,अंजलीताई वाघंबर आदींनी मनोगत व्यक्त केले. तर या कार्यक्रमासाठी मीना गूळवे,पल्लवी वाघमारे, सुमनबाई लांडगे, गेंदाबाई कांबळे,गावळनबाई मोरे, पोर्णिमा गायकवाड,कविता मतकर,सुरेश कांबळे, सिद्धार्थ वाघमारे, दिनेश तिगोटे ,राजवीर मतकर, रोहित तिगोटे,अक्षय कांबळे, गौतम सोनकांबळे, रोहिदास तिगोटे आदींनी पूढाकार घेतला. तसेच येथील नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी पुज्य भंते महाविरो थेरो यांच्या हस्ते बूध्द पूजापाठ करण्यात आले.तसेच येथे त्रीशरण पंचशिल घेण्यात आले.दिवसभर जयंतीच्या निमित्ताने अभिवादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरीकांची उपस्थिती होती.

# बहुजन भारत पार्टीच्या लोकसभा उमेद्वारीसाठी अनेकांची मागणी! मुंबईत १२ मतदारसंघाच्या मुलाखती संपन्न, ४ उमेद्वार जाहीर.

मुंबई: वनमाळी सभागृह दादर, मुंबई येथे बहुजन भारत पार्टीच्या केंद्रीय कार्यकारी समितीची बैठक दिनांक ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी संपन्न झाली. या बैठकीसाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. व्यंकटेश कसबे यांच्यासह कार्यकारी समितीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. ही बैठक दोन सत्रात संपन्न झाली. पहिल्या सूत्रात पक्षाच्या केंद्रीय कार्यकारी समितीची विशेष बैठक होऊन त्यात लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने काही ठराव पारित करण्यात आले. तर दुसऱ्या सूत्रामध्ये महाराष्ट्रातील १२ लोकसभेतून आलेल्या उमेदवारांची पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उमेद्वार निवड समितीच्या वतीने मुलाखती घेण्यात आल्या. ही निवड समीती त्रीसदस्यीय असून यात पक्षाचे राष्ट्रीय




अध्यक्ष प्रा.व्यंकटेश कसबे यांच्यासह मुंबई प्रदेश प्रभारी श्री. विष्णू कासारे आणि मुंबई प्रदेश सचिव श्री. सुभाष हानवते यांचा समावेश आहे. बहुजन भारत पार्टीकडे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या लोकसभा मतदारसंघातून उमेदवारीसाठीचे अनेक मागणी अर्ज येत आहेत. त्यापैकी ०४ फेब्रुवारी २०२४ १२ मतदारसंघातील उमेदवारांना मुंबईत मुलाखती साठी पक्षाच्या वतीने बोलाविण्यात आले होते. त्यात नांदेड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, बीड, संभाजीनगर, मावळ, मुंबई दक्षिण, मुंबई दक्षिण- मध्ये, मुंबई पश्चिम, उत्तर मुंबई, सोलापूर, या लोकसभा मतदारसंघातील उमेद्वारांचा समावेश होतो. केंद्रीय कार्यकारी समितीच्या ठरवानुसारच उमेदवार निवडीच्या दरम्यान निवड समितीने उमेदवारांची फक्त आर्थिक सक्षमता एवढेच न पाहता उमेदवाराचे उच्च शिक्षण, सामाजिक कार्य आणि प्रामाणिकता याही बाबी लक्षात घेतल्या आहेत. त्याप्रमाणे बारा लोकसभा मतदारसंघांपैकी चार मतदारसंघाचे उमेदवार निवड समितीने फायनल केले आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या निर्देशानुसार पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून फायनल झालेले उमेद्वारांची यादी खालील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

अ. क्र - लोकसभा मतदारसंघाचे नाव - उमेद्वाराचे नाव
१७ - परभणी लोकसभा- डॉ. जी. बी. खंडागळे,
१९ - औरंगाबाद (संभाजीनगर) लोकसभा - एड. सुभाष श्रावणराव नाडे,
२७- मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा - सौ. सुनिता सुर्यवंशी,
३०- मुंबई दक्षिण मध्य- शहाजी नानाई थोरात

या शिवाय लातूर लोकसभा मतदारसंघासाठी प्रा. परमेश्वर वाघमारे, मावळ लोकसभा मतदारसंघासाठी तुषार लोंढे, नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी डॉ. एच. पी. बोयाळे, बीड लोकसभा मतदारसंघासाठी राजाराम जाधव इत्यादी इच्छुक उमिद्वारांनी पक्षाकडे रितसर मागणी अर्ज देऊन मुंबईत मुलाखती दिल्या आहेत. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची दुसरी यादी लवकरच जाहीर करण्यात येईल असे महाराष्ट्र निवड समितीचे सदस्य विष्णु कासारे यांनी कळविले आहे.


PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE